# राष्ट्रीय आरोग्य अभियान
## कार्यालय, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद गडचिरोली
**E-mail** – nhmgadchiroli2021@gmail.com

NHM राष्ट्रीय आरोग्य अभियान महाराष्ट्र

### कंत्राटी पदांची भरती जाहिरात

राष्ट्रीय आरोग्य अभियान, १५ वा वित्त आयोग व मोबाईल मेडीकल युनिट अंतर्गत जिल्हयातील ग्रामीण भागातील आरोग्यसेवा बळकट करण्याकरिता मंजूर झालेल्या पदांपैकी खालीलप्रमाणे रिक्त पदे कंत्राटी / रोजंदारी पद्धतीने दिनांक २९/०६/२०२५ पर्यंतच्या कालावधीकरिता भरण्यासाठी अर्हताप्राप्त इच्छूक उमेदवारांकडून फक्त Google Form च्या माध्यमातून Online स्वरुपात अर्ज भरुन सदर भरलेल्या अर्जासह सर्व आवश्यक कागदपत्राच्या स्व-साक्षांकित प्रती जोडलेले अर्ज विहित मुदतीत मागविण्यात येत आहेत.

### राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत एसएनसीयु (लॅक्टेशन युनिट) करिता कंत्राटी पदे

| अ.क्र. | मुळ पदाचे नांव | रिक्त पदे | शैक्षणिक अर्हता | प्रवर्ग | मानधन (रुपये) |
|---|---|---|---|---|---|
| १ | लॅक्टेशन सपोर्ट स्टॉफ / एएनएम | ०२ | ANM with registration of MNC | SC - 1<br>Open - 1 | १८,०००/- |

### १५ व्या वित्त आयोगांतर्गत तालुका सार्वजनिक आरोग्य पथक (BPHU) करिता कंत्राटी पदे

| अ.क्र. | मुळ पदाचे नांव | रिक्त पदे | शैक्षणिक अर्हता | प्रवर्ग | मानधन (रुपये) |
|---|---|---|---|---|---|
| १ | एन्टोमोलॉजीस्ट | ०८ | M.Sc Zoology with 5 year Experience | ST - 2<br>NTC - 1<br>OBC - 1<br>EWS - 1<br>Open - 3 | ४०,०००/- |
| २ | पब्लीक हेल्थ स्पेशालिस्ट | १० | Any Medical Graduate with Applicable Registration & Post Graduate in MPH/ MHA/ MBA in Health | SC - 1<br>ST - 3<br>VJA - 1<br>NTC - 1<br>OBC - 2<br>Open - 2 | ३५,०००/- |

### मोबाईल मेडीकल युनिट करिता रोजंदारी तत्वावरील पदे

| अ.क्र. | मुळ पदाचे नांव | रिक्त पदे | शैक्षणिक अर्हता | प्रवर्ग | रोजंदारी मेहनताना (दरमहा) |
|---|---|---|---|---|---|
| १ | स्त्री वैद्यकिय अधिकारी | ०२ | MBBS <u>OR</u> BAMS with Registration of MMC/ MCIM | Open - 2 | Rs. 60000/- for MBBS &<br>Rs. 40000/- for BAMS |

| अ.क्र. | मुळ पदाचे नांव | रिक्त पदे | शैक्षणिक अर्हता | प्रवर्ग | रोजंदारी मेहनताना (दरमहा) |
|---|---|---|---|---|---|
| २ | एएनएम/ स्टॉफ नर्स | ०३ | ANM <u>**OR**</u> GNM <u>**OR**</u> Bsc. Nursing with registration of MNC | Open - 3 | Rs. 18000/- |
| ३ | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | ०३ | HSC, DMLT with registration of MSBTE, Mumbai | Open - 3 | Rs. 18000/- |
| ४ | औषधी निर्माता | ०२ | D.Pharma <u>**OR**</u> B.Pharma with registration of Maharashtra State Pharmacy Council | Open - 2 | Rs. 18000/- |

**सर्वसाधारण अटी व शर्ती :-**

१) सदरची पदे निव्वळ कंत्राटी व करार/रोजंदारी तत्वावरील असून राज्य शासनाची नाहीत.

२) मोबाईल मेडीकल युनिट अंतर्गत पद क्रमांक १ - स्त्री वैद्यकिय अधिकारी पदाकरिता पुरेशे स्त्री उमेदवार उपलब्ध न झाल्यास पुरुष उमेदवारांचा विचार करण्यात येईल. त्यामुळे सदर पदाकरिता पुरुष उमेदवारांना अर्ज सादर करता येईल. परंतू पुरेशे स्त्री उमेदवार उपलब्ध झाल्यास पुरुष उमेदवारांना निवडीकरिता हक्क प्रस्तापित करता येणार नाही.

३) राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत व १५ व्या वित्त आयोगांतर्गत पदांसमोर नमूद मानधन हे एकत्रीत मानधन असून त्याव्यतीरीक्त इतर कोणतेही भत्ते देय नाहीत. मोबाईल मेडीकल युनिट अंतर्गत पदाकरिता देय दरमहा मेहनताना हा त्यांचे कामकाजाचे दैनंदिन हजेरीवर (शासकिय सुट्टी बाबत सुट वगळून) अवलंबून असेल. याव्यतिरिक्त अन्य कोणताही भत्ता दिला जाणार नाही.

४) निवड झालेल्या उमेदवारांना दिनांक २९/०६/२०२५ पर्यंतच्या कालावधीकरीता नेमणूक दिली जाईल. त्यापुढील कालावधीकरीता राज्य आरोग्य सोसायटी मुंबई यांचेकडून संबधित पदाची सेवा सुरु ठेवण्यास व पदांना मंजूरी मिळाल्यानंतर तसेच मागील कालावधीत काम समाधानकारक असल्यासच पुढील ११ महिने २९ दिवस या कालावधीकरीता नेमणूक दिली जाईल. पुनर्नियुक्तीबाबत, शासकिय नियमित सेवेत सामावून घेणेबाबत किंवा शासनामार्फत सेवा संरक्षणाबाबत उमेदवारांना कुठलाही दावा करता येणार नाही.

५) ईच्छूक व अर्हताधारक उमेदवारांकडून Google Form Link च्या माध्यमातून Online स्वरुपात जाहिरात प्रसिदध केल्याच्या दिनांकापासून अर्ज मागविण्यात येत असून उमेदवारांनी संकेतस्थळावर दिलेल्या Link चा वापर करावयाचा आहे. सदर Link **दिनांक २७/०५/२०२५ ते दिनांक ०९/०६/२०२५ रोजी रात्रौ ११.५० वाजेपर्यंत** सुरु राहील. त्यानंतर सदर Link बंद केल्या जाईल. त्यामुळे विहित मुदतीत अर्ज सादर करण्याची जबाबदारी ही उमेदवारांची राहील.

६) Google Form Link च्या माध्यमातून Online स्वरुपात अर्ज सादर केल्यानंतर उमेदवारांच्या ईमेल वर Auto-Generated अर्जाची प्रत प्राप्त होईल. सदर अर्जाच्या प्रतीसह उमेदवारांनी त्यांचे सर्व आवश्यक कागदपत्राच्या स्वसाक्षांकित झेरॉक्स प्रती (Self Attested Xerox Copy) जोडून सदर अर्ज **दिनांक २८/०५/२०२५ ते दिनांक १३/०६/२०२५ या कालावधीत सकाळी १०.०० ते सायंकाळी ६.००** वाजेपर्यंत (फक्त कार्यालयीन कामकाजाचे दिवशी) **"कार्यालय, राष्ट्रीय आरोग्य अभियान, जि.प. कर्मचारी वसाहत, निवासस्थान क्रमांक बी-२ (स्लॅब), कॉम्पलेक्स परिसर, गडचिरोली"**

या पत्यावर बंद लिफाफामध्ये (त्यावर पदाचे नांव व प्रवर्ग स्पष्टपणे नमुद करुन) समक्ष अथवा नोंदणीकृत डाकेने सादर करावेत. विहित मुदतीनंतर प्राप्त अर्जांचा कोणत्याही परिस्थितीत विचार केल्या जाणार नाही.

७) उमेदवारांनी Google Form Link च्या माध्यमातून Online स्वरुपात अर्ज केला असेल आणि सदर अर्जासह त्यांचे आवश्यक कागदपत्र मुद्या क्रमांक ५ मध्ये नमुद केल्यानूसार विहित मुदतीत सादर केले नसल्यास असे अर्ज आपोआप रद्द समजण्यात येईल व सदर उमेदवारांचा निवडीसाठी कोणत्याही प्रकारे विचार केल्या जाणार नाही.

**(भरतीप्रक्रियेबाबतच्या पुढील सर्व सुचना, पात्र/अपात्र उमेदवारांची यादी, मुळ कागदपत्र पडताळणीचे वेळापत्रक इत्यादी वेळोवेळी जिल्हा परिषद गडचिरोलीचे संकेतस्थळ** www.zpgadchiroli.maharashtra.gov.in **वर प्रसिद्ध करण्यात येईल. त्यामुळे वेळोवेळी सदर संकेतस्थळाला भेट देण्याची जबाबदारी ही उमेदवारांची राहील, त्याबाबत उपरत कोणत्याही तक्रारीची दखल घेतल्या जाणार नाही.)**

८) उमेदवारांची निवड ही निव्वळ गुणवत्तेच्या आधारावर करण्यात येणार असून उमेदवारांच्या निवडीकरीता संबधित पदाची किमान शैक्षणिक अर्हता असलेल्या अंतिम वर्षाच्या/सेमिस्टरच्या टक्केवारी ला ५० गुण, पदाकरीता आवश्यक शैक्षणिक अर्हतेपेक्षा संबधित विषयामध्येच अधिकची शैक्षणिक अर्हता धारण करित असल्यास अशा शैक्षणिक अर्हतेच्या अंतिम वर्षाच्या टक्केवारीला २० गुण व शासकिय/निमशासकिय आस्थापनेवरील अनुभव धारण करित असल्यासच प्रत्येक १ वर्षाकरीता ६ गुण (जास्तीत जास्त ५ वर्षापर्यंत ३० गुण) याप्रमाणे एकूण १०० गुणांच्या आधारे गुणवत्तेनूसार अंतिम निवड करण्यात येईल.

९) उमेदवारांची अंतिम वर्षाची / सेमिस्टरची गुणपत्रिका ही टक्केवारी ऐवजी SGPA मध्ये असल्यास अशा उमेदवारांनी संबधित विद्यापिठाकडून SGPA हे टक्केवारी गुणांकन मध्ये रुपांतरीत (Convert SGPA to Percentage) करुन ते अर्जासोबत सादर करणे बंधनकारक राहील. अन्यथा उमेदवारांना गुण दिल्या जाणार नाही.

१०) विहित मुदतीत प्राप्त अर्जांची छाननी करुन उमेदवारांच्या अर्जाच्या पात्रतेबाबत, गुणांकनाबाबत यादी तसेच मुलाखतीचे/ मुळ कागदपत्र तपासणीचे वेळापत्रक जिल्हा परिषद गडचिरोलीचे संकेतस्थळ www.zpgadchiroli.maharashtra.gov.in वर प्रसिद्ध करण्यात येईल. याकरीता उमेदवारांना स्वतंत्ररित्या कळविल्या जाणार नाही. त्यामुळे उमेदवारांनी वेळोवेळी संकेतस्थळाला भेट देणे आवश्यक राहील.

११) उमेदवार एकापेक्षा अधिक पदांकरीता अर्हता धारण करीत असल्यास प्रत्येक पदांकरीता स्वतंत्र अर्ज सादर करणे व प्रत्येक अर्जाकरिता स्वतंत्र भरती शुल्काची चालान भरणे बंधनकारक आहे.

१२) राखीव (मागास) प्रवर्गातील उमेदवारांनी भरती शुल्क **रुपये १००/-** व खुल्या (अमागास) प्रवर्गातील उमेदवारांनी भरती शुल्क **रुपये १५०/-** इतकी रक्कम खालील विवरणात नमुद बॅक खात्यावर ऑनलाईन (इंटरनेट बॅकींग, फोन पे, गुगल पे ईत्यादी) अथवा विवरणात नमुद बॅक खात्यावर ऑफलाईन स्वरुपात जमा करता येईल. **धनादेश (Cheque) अथवा धनाकर्ष (DD) द्वारा शुल्क कोणत्याही परिस्थितीत स्विकारल्या जाणार नाही.**

**District Integrated Health & Family Welfare Society, Gadchiroli**

**A/c No. 11267751010**

**IFSC Code - SBIN0000298**

**State Bank of India, Gadchiroli Branch**

रक्कमे भरणा केल्यानंतर प्राप्त होणारा व्यवहार क्रमांक (Transaction ID) ऑनलाईन अर्जात नोंदविणे व व्यवहाराचा स्क्रीनशॉट (Screen shot) Online अर्ज भरतांना Upload करणे बंधनकारक आहे. त्यामुळे उमेदवारांनी सर्वप्रथम भरती शुल्काची रक्कम बॅंकेत भरणा करावी. त्यानंतरच अर्ज भरण्याची कार्यवाही करावी. सदर व्यवहाराचा स्क्रीनशॉट (Screen shot) प्रिंट करुन निवड प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत उमेदवारांनी स्वत:जवळ काळजीपुर्वक जपून ठेवावा. तसेच त्याची १ प्रत अर्जासोबत सादर करावी.

१३) **उमेदवारांची निवड पुर्ण करण्याआधी उमेदवारांना बोलावून त्यांचे अर्जाशी निगडीत सर्व मुळ कागदपत्राची पडताळणी करण्यात येईल. त्यावेळी उमेदवारांनी सदर मुळ (Original) कागदपत्र, जाहिरातीसोबत जोडलेले लहान कुटूंबाचे नमुना-अ प्रपत्र, अर्ज भरल्याबाबत उमेदवारांच्या ईमेल वर प्राप्त झालेला फार्मची प्रिंट (Print) तसेच भरती शुल्काच्या व्यवहाराचा स्क्रीनशॉट (Screen shot) ची प्रिंट ईत्यादी कागदपत्र पडताळणी समितीसमोर सादर करणे बंधनकारक राहील, अन्यथा उमेदवारास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल.**

१४) विहित अर्हता धारण करित नसलेले, अपूर्ण असलेले, विहित मुदतीत प्राप्त न झालेले, चालान स्वरुपात पुर्ण शुल्क नसलेले तसेच एकाच पदाकरिता दोनदा केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

१५) उपरोक्त पदांकरीता राखीव प्रवर्गातील पुरेशे उमेदवार उपलब्ध न झाल्यास राज्य आरोग्य सोसायटी, मुंबई यांचेकडील दिनांक २०/०७/२०१६ च्या परिपत्रकानुसार खुल्या प्रवर्गातील उमेदवारांचा निवडीकरीता विचार करण्यात येणार असल्याने खुल्या प्रवर्गातील उमेदवारांना सुद्धा अर्ज सादर करण्याची मुभा राहिल. परंतू असे अर्ज खुल्या प्रवर्गाकरिता आवश्यक शुल्कासह भरणे बंधनकारक राहील. तसेच मागास प्रवर्गातील आवश्यक उमेदवार उपलब्ध झाल्यास त्यांचा कोणत्याही परिस्थितीत निवडीसाठी विचार केल्या जाणार नाही, याची संबधित उमेदवारांनी नोंद घ्यावी.

१६) सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई यांचे दिनांक २५ एप्रिल २०१६ चे शासन निर्णयास अनुसरुन Online अर्ज करण्याच्या शेवटच्या दिनांकास म्हणजे **दिनांक ०९/०६/२०२५ रोजी** उमेदवाराचे किमान वय १८ वर्षे व कमाल वय ३८ वर्षे (राखीव प्रवर्गाकरीता कमाल वय ४३ वर्षे) राहील.

१७) भरती प्रक्रिये दरम्यान ज्या-ज्या वेळी उमेदवारांना बोलविण्यात येईल, त्या-त्या वेळी त्यांना स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल. तसेच सदर उपस्थितीकरीता कोणतेही मानधन अथवा प्रवास खर्च देय राहणार नाही.

१८) भरती प्रक्रिये दरम्यान उमेदवाराने चुकीची माहिती सादर केल्याचे, कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे, दबाव तंत्राचा वापर किंवा अनूचीत मार्गाचा अवलंब केल्याचे आढळून आल्यास कोणत्याही टप्यावर त्याची उमेदवारी/नियुक्ती कोणतीही पुर्वसुचना न देता रद्द करण्यात येईल. तसेच आवश्यक असल्यास प्रशासकिय व फौजदारी कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

१९) ज्या तांत्रीक संवर्गातील पदांना विहित केलेल्या केन्द्र शासन अथवा राज्य शासनाच्या नोंदणी विभागाकडून वैध असलेले नोंदणी प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक आहे, अशा पदाच्या उमेदवारांनी त्यांचे अर्जासोबत सदर वैध नोंदणी (Valid Registration) प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहिल.

२०) उमेदवारांनी अर्ज सादर करतांना त्यांचे अद्यावत असलेले ईमेल आयडी व मोबाईल क्रमांक अचुक नोंदवावे. तसेच ते भरतीप्रक्रिया पुर्ण होईपर्यंत चालू राहिल, याची दक्षता घ्यावी. जेणेकरुन भरती प्रक्रियेदरम्यान उमेदवारांना या कार्यालयामार्फत संपर्क करणे सोईस्कर होईल.

२१) महाराष्ट्र नागरी सेवा नियम २००५ अन्वये **लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापन नमूना-अ** या प्रपत्रात अर्जासोबत तसेच कागदपत्र पडताळणीचे वेळी सादर करणे आवश्यक राहील.

२२) उमेदवाराने अधिवास / राष्ट्रीयत्वाचे सक्षम अधिकाऱ्यांकडून प्राप्त केलेले प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील व ते अर्जासोबत तसेच कागदपत्र पडताळणीचे वेळी सादर करणे आवश्यक राहील.

२३) शासन निर्णय दिनांक १३ जानेवारी २००९ नूसार खुला (अमागास), अनूसुचीत जाती/ अनूसुचीत जमाती प्रवर्ग वगळता इतर मागास प्रर्वगातील (VJ, NT, SBC & OBC) उमेदवारांनी आरक्षणाचा लाभ मिळण्यासाठी दिनांक ३१ मार्च २०२६ पर्यंत वैध असलेले उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (नॉन क्रिमीलेअर) प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील व ते अर्जासोबत तसेच कागदपत्र पडताळणीचे वेळी सादर करणे आवश्यक राहील.

२४) भरती प्रकियेचे संपूर्ण अधिकार, पदे कमी-जास्त करणे, भरती प्रक्रिया रद्द करणे, अटी व शर्तीमध्ये बदल करणे ईत्यादी सर्व अधिकार मा. अध्यक्ष, निवड समिती तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद गडचिरोली यांचेकडे राखून ठेवण्यात आलेले आहे.

अध्यक्ष
निवड समिती तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद गडचिरोली

सदस्य सचिव
निवड समिती तथा
जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद गडचिरोली

राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य व कुटुंब कल्याण संस्था
NRHM
गडचिरोली

## महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापन) नियम २००५ अन्वये

### प्रतिज्ञापन
### नमूना-४
### (नियम ४ पहा)

मी श्री/श्रीमती/कुमारी ..................................................................

श्री. .......................................... यांचा/यांची मुलगा/मुलगी /पत्नी, वय ........ वर्षे, राहनार ....................... याद्वारे पुढीलप्रमाणे असे जाहीर करतो/करते की,

१) मी ..................................................... या पदाकरीता माझा अर्ज दाखल केलेला असून माझा अर्ज क्रमांक ............ हा आहे.

२) आज रोजी मला ......... (संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २८ मार्च २००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ....... आहे. (असल्यास जन्मतारीख नमूद करावी.)

३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर, दिनांक २८ मार्च २००५ व त्यानंतर जन्माला आलेल्या मुलामुळे या पदासाठी मी अपात्र राहील, याची मला जाणीव आहे.

**(टिप : अविवाहित उमेदवारांनी "लागू नाही" असे नमूद करुन स्वाक्षरी करावी.)**

ठिकाण :
दिनांक :

उमेदवाराची स्वाक्षरी
(पुर्ण नांव ..................................)

## अर्जासोबत जोडावयाच्या दस्ताऐवजांचा क्रम खालीलप्रमाणे-

१) ओळखीचा पुरावा (आधारकार्ड, पॅनकार्ड, मतदान ओळखपत्र किंवा वाहन चालविण्याचा परवाना यापैकी कोणतेही १ ओळखपत्र).

२) ईमेल वर प्राप्त ऑनलाईन फार्म ची प्रत.

३) लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापन नमुना - ४.

४) भरती शुल्क भरल्याची प्रत.

५) जन्मतारखेचा पुरावा. (टी.सी. / जन्मतारीख दाखला यापैकी कोणतेही एक).

६) जात / जात वैधता प्रमाणपत्र (मागासवर्गीय प्रवर्गाकरिता).

७) वय व अधिवास / राष्ट्रीयत्वाचे प्रमाणपत्र.

८) दिनांक ३१/०३/२०२६ पर्यंत वैध असलेले नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र (अनु. जाती, अनु.जमाती व खुला प्रवर्ग वगळून).

९) शैक्षणिक अर्हतेच्या सर्व गुणपत्रिका (वर्षनिहाय क्रमाने).

१०) पदवीका / पदवी प्रमाणपत्र (पदाच्या आवश्यकतेप्रमाणे).

११) संबधित विषयामध्येच पदाच्या किमान अर्हतपेक्षा उच्च शैक्षणिक अर्हता असल्यास सर्व गुणपत्रिका व प्रमाणपत्र.

१२) संबधित पदाकरिता विहित मंडळाचे वैध नोंदणी प्रमाणपत्र (पदाच्या आवश्यकतेप्रमाणे).

१३) अनुभव प्रमाणपत्र (फक्त शासकिय संस्था, विभाग, शासन अंगीकृत संस्था यांचेकडील).